महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

सोमवार ■ १० नोव्हेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १३५ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

# दीपेश म्हात्रे यांचा भाजपमध्ये प्रवेश!



## दीपेश म्हात्रेसह बारा नगरसेवकांचा भाजपमध्ये प्रवेश; सेना, काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी हाती घेतले 'कमळ'...

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली - आगामी महापालिका निवडणुकीतील चार सदस्य प्रभाग पद्धतीत निवडून आले पाहिजे, असा भविष्यलक्ष्यी विचार करून कल्याण, डोंबिवली शहरातील शिंदे शिवसेनेतील कार्यकर्ते, काँग्रेसचे माजी नगरसेवक, ठाकरे गटाचे कार्यकर्ते यांनी रविवारी भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत डोंबिवली जीमखाना येथे आयोजित कार्यक्रमात भाजपमध्ये प्रवेश केला. यामध्ये सर्वाधिक लक्ष्यवेधी ठरला तो उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे डोंबिवली जिल्हाध्यक्ष दीपेश म्हात्रे यांचा भाजप प्रवेश !**

मागील तीन महिन्यांपासून ठाकरे गटाचे जिल्हाध्यक्ष दीपेश म्हात्रे भाजपमध्ये प्रवेश करणार म्हणून चर्चा सुरू होती. म्हात्रे यांच्या प्रवेशाने या चर्चेला पूर्ण विराम मिळाला आहे. दीपेश यांच्या सोबत त्यांच्या मातोश्री माजी नगरसेविका रत्नाबाई म्हात्रे, बंधू माजी नगरसेवक जयेश आणि त्यांच्या शेकडो समर्थक कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. माजी खासदार कपील पाटील, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचा पुढाकार या प्रवेशासाठी महत्वाचा ठरला. आई, वडिलांचे आशीर्वाद घेऊन मोठागाव येथील बंगला येथून दीपेश म्हात्रे आणि त्यांचे समर्थक मिरवणुकीने वाजतगाजत मिरवणुकीने पोहचले.

मागील ४० वर्ष काँग्रेस पक्षाशी एकनिष्ठ राहिलेले माजी प्रदेश काँग्रेस सचिव आणि माजी नगरसेवक संतोष केणे यांनी राहुल आणि प्रणव ही दोन मुले, तसेच आपल्या कार्यकर्त्यांसह भाजपमध्ये प्रवेश केला. शिंदे शिवसेनेचे कट्टर समर्थक माजी नगरसेवक दिवंगत वामन म्हात्रे यांच्या मनोज वैद्य, राजू सावंत, संदीप सामंत आणि अरविंद मानकर या कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. कल्याण पूर्वेतील उद्योजक संजय गायकवाड, कल्याण ज्वेलर्स असोसिएशनचे राकेश मुथा अशा विविध पक्षातील, सामाजिक संघटना, संस्था, व्यावसायिकांनी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला.

**राष्ट्रीय हिताच्या मुल्यांचे रक्षण आणि हिंदुत्वाची कास असणाऱ्या भाजपमध्ये आपण सामान्य जनतेची कामे अधिक प्रभावीपणे करता यावीत, त्यांना नागरी समस्यांमध्ये न्याय मिळवून देता यावा यासाठी प्रवेश केला. ही कामे करताना भाजपमधून नक्कीच ताकद मिळेल असा विश्वास आहे.**



**- दीपेश म्हात्रे, भाजप कार्यकर्ता**

**कल्याण, डोंबिवली पालिकेवर पारदर्शकपणे, विकासाची दृष्टी समोर ठेऊन काम करेल असा महापौर देण्याचा निर्णय महायुतीत झाला आहे. महापौर कोणाचा असेल याविषयी लोकांमध्ये संभ्रम आहे. तो उलगडा नंतर होईल. पण, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महापौर देण्याचे नक्की असून तो भाजपचा असेल याची खात्री देतो.**



**- रवींद्र चव्हाण, भाजप प्रदेशाध्यक्ष**





## लक्षवेधी

### कल्याण डोंबिवली परिसरात वीज पुरवठा चार तास खंडीत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** - पडघा पाल येथील उच्च दाब विद्युत वाहिनीत तांत्रिक बिघाड झाल्याने रविवारी सकाळी सहा ते सकाळी दहा वाजेपर्यंत कल्याण पूर्व, डोंबिवली शहर, शिळफाटा, २७ गाव परिसराचा वीज पुरवठा चार तास बंद पडला. अचानक वीज पुरवठा बंद पडल्याने स्थानिक महावितरण कर्मचाऱ्यांची धावपळ झाली.

रविवार सुट्टीचा दिवस. त्यात घरात वीज नसल्याने रहिवासी त्रस्त झाले होते. स्थानिक महावितरण कार्यालयात संपर्क करून, प्रत्यक्ष जाऊन वीज पुरवठा कधी पूर्ववत होईल याची विचारणा नागरिक करत होते. पण हा वीज पुरवठा भिवंडी पडघा येथील वीज पुरवठा उपकेंद्रातील उच्चदाब वीज वाहिनीत बिघाड झाल्याने बंद पडला आहे, अशी उत्तरे महावितरण कार्यालयातील कर्मचारी नागरिकांना देत होते.

### जिल्ह्याच्या भूजल पातळीत घट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** जिल्ह्यातील भूजल पातळी सातत्याने घटत असून, गेल्या चार ते पाच वर्षांमध्ये केवळ ०.२५ मीटर इतकीच वाढ झाल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे. कृषी विभागामार्फत प्राप्त पर्जन्यमानाच्या आणि भूजल सर्वेक्षण विभागाच्या अहवालानुसार ही स्थिती अत्यंत चिंताजनक असल्याचे मानले जात आहे. सप्टेंबर २०२५ अखेर ठाणे जिल्ह्यामध्ये झालेल्या सरासरी पर्जन्यमानाच्या तुलनेत भूमिगत जलसाठ्यात फारसा सुधार दिसून आलेला नाही. ठाणे जिल्ह्याच्या विविध तालुक्यांमधील सरासरी भूजल पातळी मागील वर्षांच्या तुलनेत फारशी वाढलेली नाही. २०२१ ते २०२५ या कालावधीत जिल्ह्याची भूजल पातळी ०.४३ मीटर वरून अवघी ०.६८ मीटरपर्यंतच पोहोचली आहे. पाच वर्षांत केवळ ०.२५ मीटर वाढ झाली आहे.

ठाणे जिल्ह्यातील भूजल पातळीत वाढ करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने विविध उपायोजना राबविण्या सुरुवात केली आहे. केंद्रीय जलशक्ती मंत्रालयातर्फे जलधर नकाशे तयार करण्याचा महत्वकांक्षी प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. याअंतर्गत ठाणे जिल्ह्यातील भूजल पातळी, भूस्तराची स्थिती यांचा अभ्यास यामध्ये करण्यात आला आहे. २०२२-२३ मध्ये जिल्ह्याच्या सर्व तालुक्याचा समावेश जलधर नकाशामध्ये करण्यात आला आहे. भूजल व्यवस्थापनासाठी संस्थात्मक आराखडा तयार करून तो जिल्ह्यात राबविण्याची सूचना यामध्ये करण्यात आली आहे. त्यासाठी भूजल व्यवस्थापन आराखडाही सुचविण्यात आला आहे. जलशक्ती मंत्रालयाच्या अंतर्गत असलेल्या केंद्रीय भूजल मंडळाच्या शास्त्रज्ञांनी ठाणे जिल्ह्यातील भौगोलिक स्थिती, जमिनीखालील खडक, भूजलाची स्थिती, जलधर नकाशा व भूजल पातळी वाढविण्यासाठी आवश्यक उपाययोजनांची समावेश असलेला अहवाल तयार केला होता. यानुसार भूजल पातळीवाढविण्यासाठी उपायोजना राबविण्यात येत आहे. मात्र जिल्ह्याची भूजल पातळीतील वाढ ही अत्यंत संथगतीने होत आहे.

### उद्या कल्याण, टिटवाळ्याचा पाणीपुरवठा बंद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली, ता. ९ :** कल्याण, टिटवाळा शहरांचा पाणीपुरवठा मंगळवारी (ता. ११) १२ तास बंद राहणार आहे. मंगळवारी सकाळी ९ ते रात्री ९ या वेळेत पाणीपुरवठा बंद राहणार आहे. मोहिली जलशुद्धीकरण केंद्रावर देखभाल दुरुस्तीचे काम करण्यात येणार आहे, असे कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने सांगितले आहे.

कल्याण, टिटवाळा शहर परिसराला उल्हास नदी काठच्या मोहिली जलशुद्धीकरण केंद्रातून पाणीपुरवठा केला जातो. कल्याण पूर्वेतील वालधुनी परिसर, कल्याण पश्चिमेतील बिर्ला महाविद्यालय परिसर, उपप्रादेशिक परिवहन विभाग परिसर, टिटवाळा अ प्रभाग क्षेत्रातील मांडा, टिटवाळा मोहने, आंबिवली, धाकटे शहाड, शहाड, बंदरपाडा वडवली या केंद्राच्या यांत्रिक आणि तांत्रिक देखभाल दुरुस्तीचे कामे येत्या मंगळवारी केला जाणार आहे.

१२ तास पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येत असल्याने दुसऱ्या दिवशी कमी दाबाने पाणीपुरवठा होण्याची शक्यता पाणीपुरवठा विभागाने वर्तवली आहे. नागरिकांनी एक दिवस पुरेल इतका पाणीपुरवठा आपल्या घरात करून ठेवावा, असे पालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

# लाडकी बहिण योजना कधीच बंद होणार नाही !

## - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** कोणी कितीही अफवा पसरवल्या तरी सुद्धा लाडकी बहिण योजना कधीही बंद होणार नाही, असे वक्तव्य उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यात बोलताना केले. शिवसेना पुरस्कृत साई दर्शन फाउंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'महिला बचत गट स्नेहसंमेलन २०२५' या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते. यावेळी त्यांनी उपस्थित महिलांशी संवाद साधला. या महिला बचत गट स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमाला बहिणीच्या चेहऱ्यावरचा आनंद बघायला आलो आहे. कारण, लाडक्या बहिणींमुळे सव्वा लाखाच्या लीडने मी निवडून आलो, त्यांच्या आशीर्वादाने आमदार झालो. त्यामुळेच मी राज्याचा मुख्यमंत्री पण झालो आणि अडीच वर्ष तुमच्या सगळ्यांच्या आशीर्वादाने या राज्याची धुरा मला सांभाळायची संधी मिळाली, असे मत उपमुख्यमंत्री शिंदे यांनी मांडले. ते पुढे म्हणाले महिलांसाठी सुरू केलेल्या लाडकी बहिण योजनेतून अनेक छोटे मोठे व्यवसाय सुरू झाले, महिलांना कुटुंबात मान मिळाला.

**गेल्या अडीच वर्षात राज्याचा वेगाने विकास झाला. अनेक लोककल्याणकारी योजना आम्ही मार्गी लावल्या. ठाणे शहरात वडाळा ते कासारवडवली दरम्यान मेट्रो मार्ग सुरू होत असून अंतर्गत मेट्रो मार्ग देखील तयार केला जाणार आहे. लवकरच त्याचे काम सुरू होणार असून त्याद्वारे हा सर्व भाग मेट्रोनी जोडला जाईल, असे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.**

**ठाण्यात निवडणुका आल्या की क्लस्टरची चर्चा होते असा आरोप होतो. परंतू, किसननगरसाठी क्लस्टर योजनेला मंजुरी देऊन १८ मजल्यापर्यंतचे काम पूर्ण झाले आहे. त्यामुळे एकेकाळी या योजनेसाठी प्रखर आंदोलन करावे लागले असले, तरीही आता लवकरच किसननगरवासीयांना आपल्या हक्काच्या घरात जाता येणार आहे, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.**

**महिलांना लखपती बनवण्याचा आमचा मानस असून त्यासाठी तुम्हा सर्वांची साथ गरजेची असल्याचे यावेळी त्यांनी नमूद केले. लाडकी बहिण योजना कधीही बंद होणार नाही असे सांगताना त्यासाठी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत देखील महायुतीला अशीच साथ द्यावी अशी अपेक्षाही यावेळी त्यांनी व्यक्त केली.**



# रेशनचे धान्य काळ्याबाजारात ?

## शहापूरात १६५ क्विंटल धान्य जप्त!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर :** तालुक्यात आदिवासी विकास महामंडळ विभागात भात खरेदीमध्ये कोट्यवधी रुपयांच्या घोळाची चौकशी सुरू असतानाच भिवंडी येथील शासकीय गोदामातून शहापूर तालुक्यातील अघईमधील रेशन दुकानात नेले जाणारे धान्य काळ्याबाजारात विक्रीसाठी जात असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी शहापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून ट्रकचालक एजाज शहा याला अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी ट्रकमधून १६५ क्विंटल गहू व तांदूळ जप्त केला आहे. सदर ट्रक शहापुरातील एका खाजगी गोडाऊन समोर कसा काय ? याबाबत अनेक प्रश्न निर्माण झाले असून यामुळे शहापूर तालुका शासकीय धानाची काळ्या बाजारात विक्री करण्याचे आगार बनले आहे की काय असा प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच गोरगरिबांच्या तोंडचा घास हिरावून नेणाऱ्या धान्य तस्करांची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी अशी मागणी केली जात आहे. तालुक्यातील अघई येथील रेशन दुकानात जाणाऱ्या ट्रकमध्ये १६० क्विटल तांदूळ व पाच क्विटल गहू असा १६५ क्विंटल धान्य साठा होता. हे धान्य भिवंडी येथील शासकीय गोदमातून शहापूर तालुक्यातील अघई येथील रेशन दुकानात जाणार होते, अशी माहिती शहापुर तहसीलदार परमेश्वर कासुळे व पुरवठा अधिकारी अमृता सूर्यवंशी यांनी दिली.

**या प्रकरणी ट्रक चालक एजाज शहा याला अटक करण्यात आली असून ट्रकमधील तांदळाचे ५० क्टिल वजनाचे ३२० कट्टे असे १६० क्विंटल तांदूळ व गव्हाचे १० कट्टे असा पाच क्विंटल गहू असा एकूण १६५ क्विंटल धान्यसाठा ट्रकसह जप्त करण्यात आला असल्याची माहिती पोलीस निरीक्षक मुकेश ढगे यांनी दिली असून शहापुरचे पोलीस उपविभागीय अधिकारी मिलिंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू असल्याचे सांगितले.**

# अंबरनाथमध्ये शिवसेनेत अंतर्गत वाद?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे, ता. ९ :** विधानसभा निवडणुकीत आमदार डॉ. बालाजी किणीकर यांनी विजयाची हॅट्रिक मारली. एकीकडे महाविकास आघाडीचा उमेदवार घाम फोडत असताना शिवसेना शिंदे गटाचे स्थानिक ज्येष्ठ नेते अरविंद वाळेकर यांची असहकाराची भूमिका खूप चर्चेत होती. या वेळी किणीकर विरुद्ध वाळेकर वाद उफाळून आल्याचे चित्र होते. वास्तविक वाळेकर हे अंबरनाथमधील जुने नेतृत्व असून, त्यांच्या भूमिकेची दखल घेतली जाते. त्यामुळे त्यांना दुखावून निवडणूक पार पाडता येणार नाही, याची खात्री झाल्याने आमदार डॉ. किणीकर यांनी नमतेपणा घेतला. वाळेकर यांचे वर्चस्व असललेल्या शाखेत जाऊन शेकडो शिवसैनिकांसमोर किणीकर यांनी शरणागती पत्करली, पण दोन्ही नेत्यांच्या कार्यकर्त्यांमध्ये वाद इतके टोकाचे आहेत, पक्ष नेतृत्वाने समज दिल्यानंतरही ते संपले नाहीत. या घटना आता इतिहास जमा झाल्या असल्या तरी त्याची खपली कधीही निघण्याची शक्यता आहे. आता नगर परिषद निवडणुकीत आमदार किणीकर यांची भूमिका महत्त्वाची असणार आहे. त्यामुळे वाळेकर बॅकफूटवर गेल्याचे दिसते. याचा प्रत्यय दोन दिवसांपूर्वी झालेल्या एका कार्यक्रमातील वाळेकरांच्या वक्तव्यातून येतो. पक्षांतर्गत कोणताही संघर्ष नसून आमची विकासासाठी स्पर्धा असल्याची सावरासावर वाळेकरांनी केली, पण आमदार किणीकर झाले गेले, सर्व विसरून जातील का, हा प्रश्न आहे.













# गुरवलीच्या सरपंचपदी प्रकाश दळवी बिनविरोध

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण तालुक्यातील गुरवली ग्रामपंचातीच्या सरपंच पदी प्रकाश दळवी यांची नुकताच बिनविरोध निवड करण्यात आली आहे. प्रकाश दळवी हे भाजपचे जेष्ठ कार्यकर्ते असून होतकरू सरपंच म्हणून त्यांनी या पूर्वी ही सरपंच पद सांभाळलं आहे.

ग्रामपंचायत हद्दीतील नागरिकांना पायाभूत सुविधा उपलब्ध करणे व गुरवली ग्रामपंचायत आदर्शवत गाव करणे यासाठी काम करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

दैनिक ठाणे **जीवनदीप वार्ता**

news.thanejeevandeep@gmail.com





# पेण नगरपरिषद निवडणुकीची चाहूल

## मतदारांना बदल अपेक्षित

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : पेण नगरपरिषदेच्या निवडणुकीची लगबग सुरू झाली आहे असे लक्षात येताच कधी नाही ते चेहरे पुन्हा लोकांमध्ये अचानक दिसायला लागू लागले आहेत.

पाच वर्षांत कधीही न दिसलेले, ना कुठल्याही समस्येला प्रतिसाद दिलेले — तेचआता जनतेसोबत संवाद साधताना दिसत आहेत. ज्यांचा पाच वर्षांत एकदाही मेसेज आला नाही,ते आता दररोज "गुड मॉर्निंग" आणि "नमस्कार साहेब" असे संदेश जनतेला पाठवू लागले आहेत..आश्चर्यच आहे ना! असो.पण ही नवी संकल्पना रूढ होताना दिसत आहे.

मागील पाच वर्षांपासून पाणी, रस्ते, वीज अशा मूलभूत नागरी गरजांसाठी जनतेने वारंवार आवाज उठवला, नगरपरिषदेचे उंबरठे झिजवले, अनेकदा वृत्तपत्रात बातम्या प्रसिद्ध झाल्या, आंदोलने सुद्धा झाली पण ह्या गोष्टींकडे कुणीही लक्ष दिले नाही. कदाचित "जनसेवा हीच खरी ईश्वर सेवा" याचा विसर पडला असावा असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. आता त्याच जनतेशी गोड बोलणं, त्यांना मोबाईल करणे हे अचानक चालू झाले आहे. म्हणजे निवडणुका आली की त्यांना तीच जनता पुन्हा पुन्हा आठवते. ह्यांना काय म्हणावे, सेवाभावी की गरजवंत..? परंतु पेणची जनता-जनार्दन आता हुशार आहे अन् तेवढीच जागृत झाली झाली आहे.यावेळी मात्र कोणावरही आंधळा विश्वास न ठेवता विचारपूर्वक निर्णय नक्कीच घेऊन काम करणाऱ्या, जबाबदार आणि प्रामाणिक व्यक्तींनाच संधी देईल असेच चित्र सध्या तरी पहावयास मिळत आहे. चला पेणकरानो आता बदल घडवण्याची वेळ आली आहे आणि तो घडवायचा आहे. म्हणून उठा पेणकर जागे व्हा , एकत्र येऊ या अणि जनतेचे सच्चे सेवक निवडून देऊ या असे जाहीर आवाहन पेण शहरातील नागरिकांनी केले आहे.

# पोषण अभिसरण समिती व कुपोषण निर्मूलन टास्क फोर्सची बैठक

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ठाणे जिल्ह्यातील पोषण स्थितीचा आढावा घेण्यासाठी तसेच कुपोषण निर्मूलनासाठी कार्यक्षम धोरणे आखण्यासाठी "जिल्हा पोषण अभिसरण समिती" व "कुपोषण निर्मूलन टास्क फोर्स" यांची संयुक्त बैठक जिल्हाधिकारी कार्यालयातील समिती सभागृहात दि. ०६ नोव्हेंबर, २०२५ रोजी जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ (भा.प्र.से.) यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

या बैठकीस जिल्हा शल्य चिकित्सक ठाणे, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बाल विकास विभाग) संजय बागुल, संतोष भोसले, नोडल अधिकारी (ठाणे नागरी), सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी (शहरी व ग्रामीण), जिल्हा परिषद ठाणे, विविध महानगरपालिका वैद्यकीय अधिकारी, शिक्षण विभाग, अन्न व औषध प्रशासन



विभाग, तसेच आर.बी.एच.के. (RBHK) प्रतिनिधी आदी अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांनी ठाणे जिल्ह्यातील सध्याच्या पोषण स्थितीचा सविस्तर आढावा घेतला. ठाणे जिल्ह्यातील ३,५६१ अंगणवाडी केंद्रांमार्फत १०० टक्के पूरक पोषण आहार नियमितपणे वाटप केला जात असल्याचे समाधानकारक चित्र बैठकीत मांडण्यात आले. या उपक्रमामुळे मागील वर्षाच्या तुलनेत कुपोषणाचे प्रमाण घटले असल्याचे अहवालांद्वारे स्पष्ट झाले.

या यशस्वी प्रयत्नांनंतरही पोषण व्यवस्थेच्या शाश्वत परिणामासाठी अंगणवाडी सेविकांच्या क्षमता विकासासाठी विशेष प्रयत्नांची आवश्यकता असल्याचे जिल्हाधिकारी यांनी अधोरेखित केले.

बैठकीदरम्यान जिल्ह्यातील बालकांच्या पोषणाशी संबंधित VCDC (Village Child Development Committee) आणि CTC (Child Treatment Centre)

### जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली बैठक

यांच्या कार्यक्षम अंमलबजावणीवर भर देण्यात आला. बालकांच्या गृहभेटींचे प्रमाण वाढविणे, वजन व उंची मोजणीचे नोंदीकरण वेळेवर पूर्ण करणे, आहार वितरण आणि पूरक आहाराचे प्रभावी नियोजन करणे, CTC केंद्रांसाठी पूरक बुडीत मजुरीची तरतूद करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

अंगणवाडी केंद्रांच्या कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी जिल्हास्तरावर "अंगणवाडी सक्षमीकरण टीम" स्थापन करण्याच्या सूचना दिल्या. या टीममध्ये जिल्हा कार्यक्रम अधिकारी, CDPO, NGO प्रतिनिधी, तसेच UNICEF यांचा समावेश राहणार असून, अंगणवाडी केंद्रांच्या प्रशिक्षण, देखरेख आणि सेवा गुणवत्तेत सातत्यपूर्ण सुधारणा साधली जाणार आहे.

"ठाणे जिल्ह्यातील बालकांचे आणि मातांचे पोषण हे प्रशासनाचे सर्वोच्च प्राधान्य आहे. पूरक पोषण आहाराची शंभर टक्के अंमलबजावणी ही आनंददायी बाब असली, तरी आता आपले लक्ष गुणवत्तेच्या वृद्धीकडे आणि सेवांच्या सक्षमीकरणाकडे असले पाहिजे. अंगणवाडी सेविका आणि प्रकल्प अधिकारी यांनी स्थानिक स्तरावर सक्रिय सहभाग घेतल्यास 'कुपोषणमुक्त ठाणे' हे उद्दिष्ट निश्चित साध्य होईल."
- जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ

बैठकीचा समारोप करताना जिल्हा कार्यक्रम अधिकारी संजय बागुल यांनी सर्व संबंधित विभागांमध्ये समन्वय ठेवून आगामी काळात पोषण अभियान अधिक प्रभावी करण्याचे आश्वासन दिले.

### काळू नदीवरील मोडकळीस आलेल्या बंधाऱ्यामुळे

# टिटवाळ्यात पाणीटंचाईचे संकट

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**टिटवाळा** : कल्याण-डोंबिवली महानगरपालिका "अ" प्रभागातील टिटवाळा गणेशमंदिर परिसरातील नागरिकांना पुन्हा एकदा पाणीटंचाईचा सामना करावा लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. महाराष्ट्र शासनाच्या पाटबंधारे विभागाकडून टिटवाळा येथील काळू नदीवरील के.टी. बंधाऱ्याची दुरवस्था असून, त्याचे दरवाजे अद्यापही बसवले गेले नाहीत. महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने यासंदर्भात पाटबंधारे विभागाला पत्र पाठवूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

सदर बंधाऱ्याचे दरवाजे न बसवल्याने नदीतील पाणी विनाकारण वाहून जात असून, पाण्याची पातळी झपाट्याने घटते आहे. परिणामी, नदीकाठच्या भागांमध्ये कोरडेपणाची चिन्हे दिसू



### नागरिकांमध्ये संतापाचा उद्रेक!

लागली आहेत. टिटवाळा आणि मांडा परिसरातील नागरिकांना लवकरच गंभीर पाणीटंचाईचा सामना करावा लागू शकतो, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, प्रशासनाच्या नियोजनशून्य कारभारामुळे यावर्षी पावसाळ्यातही पाणीटंचाईचा त्रास भोगावा लागला.

मोडकळीस आलेला बंधारा हा परिसरातील पिण्याच्या पाण्याचा मुख्य स्रोत असून, त्यातील सततची गळती मोठ्या प्रमाणात पाणी वाया घालवते. परिणामी, नागरिकांना नियमित पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे.

या गंभीर परिस्थितीकडे लक्ष वेधत माजी उपमहापौर बुधाराम सरनोबत यांनी जलसंपदा विभाग, ठाणे कार्यालयाला तातडीने बंधाऱ्याची दुरुस्ती करून दरवाजे बसवण्याची मागणी केली आहे. या अगोदरही आपण २०१२ रोजी या बंधाऱ्याच्या जागी डॅम (धरण) बांधण्याची मागणी केली होती. याची उंची वाढवली तर मांडा टिटवाळ्यात मोहिली जे आता पाणी आणावे लागते त्यांची गरज भासणार नाही , कारण या ठिकाणी पंपिंग स्टेशन आहे , फिल्टर प्लांट आहे , फिडर आहे असे असतानाही केवळ या ठिकाणे बंधारा बाधण्यात आला आहे . यामुळे "नागरिकांना दरवर्षी पाणीटंचाईचा त्रास सहन करावा लागतो, आणि प्रशासन मात्र झोपलेले आहे. यावेळी ठोस पाऊले उचलली नाहीत, तर जनतेचा संताप रस्त्यावर दिसेल," असा इशाराही त्यांनी दिला आहे. प्रशासनाने तातडीने पाऊले न उचलल्यास टिटवाळ्यातील पाणीटंचाईचं संकट तीव्र होण्याची शक्यता नाकारता येत नाही!

# धसई विद्यालयाचे प्राचार्य प्रमोद घोलप सेवानिवृत्त!



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड:** धसई गावचे सुपुत्र व महात्मा गांधी धसई विद्यालयाचे प्राचार्य प्रमोद हिराजी घोलप हे नियत वयोमानानुसार 31 आक्टोंबर 2025 रोजी 36 वर्ष शैक्षणिक सेवा करून निवृत्त झाले आहेत.

जनसेवा शिक्षण मंडळाच्या संस्थेच्या माध्यमातून मुरबाड तालुक्यातील मिल्हे गावातील शाळेपासून त्यांनी आपल्या शैक्षणिक कामकाजाला सुरवात केली. एक शिस्तप्रिय व अभ्यासू, शैक्षणिक कामकाजाचा प्रचंड अनुभव त्यांच्या पाठीशी होता. शिक्षण क्षेत्रातील अनेक लोकांशी त्यांचा उत्तम संपर्क असल्यामुळे त्याचा उपयोग त्यांनी विद्यार्थ्यांना मिळवून दिला.

धसई येथे ते अनेक वर्ष प्राचार्य म्हणून काम करत असताना त्यांनी सहशिक्षकांना सोबत घेऊन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणांकासह इतर भौतिक सुविधा निर्माण केल्या आहेत. शाळेला दर्जा,उंची दिली, प्रतिष्ठा दिली. अशा प्रकारचे अष्टपैलू व्यक्तिमत्व असलेले घोलप सर हे निवृत्त झाल्या नंतर त्यांना मुरबाड विधानसभेचे आमदार किसन कथोरे, जनसेवा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष गोटिराम पवार, शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्यासह शैक्षणिक, राजकीय, सामाजिक क्षेत्रातील विविध मान्यवरांनी त्यांना प्रत्यक्ष भेटून, सोशल मिडियाच्या माध्यमातून शुभेच्छा दिल्या आहेत.

# बी एन एन महाविद्यालयाचे विद्यार्थी वक्तृत्व स्पर्धेत अव्वल



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : "सहकारातून समृद्धी" या विषयावरील वक्तृत्व स्पर्धेत पद्मश्री अण्णासाहेब जाधव भारतीय समाज उन्नती मंडळाच्या बी.एन.एन. महाविद्यालयातील कॉमर्स तृतीय वर्षाचा विद्यार्थी राज दहीवाल याने प्रथम तर कला शाखेची तृतीय वर्षाची नाजमीन शेख हिने तृतीय क्रमांक मिळवला. आंतरराष्ट्रीय सहकारी वर्ष २०२५ निमित्त महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या., पुणे यांच्या विद्यमाने तसेच ठाणे-पालघर जिल्हा सहकारी बोर्ड मर्या., कल्याण यांच्या वतीने आणि सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे तसेच वराई प्रगती को-ऑप. क्रेडिट सोसायटी लिमिटेड, अर्नाळा यांच्या संयुक्त सहकार्याने ठाणे व पालघर जिल्ह्यासाठी वरिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा "सहकारातून समृद्धी" या विषयावर शनिवार दि. ८ नोव्हेंबर रोजी सतीश प्रधान महाविद्यालय, ठाणे येथे आयोजी करण्यात आली होती. या स्पर्धेत ठाणे व पालघर जिल्ह्यातील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता यात राज व नाजमीन यांनी ही प्राविण्य मिळविले. राज व नाजमीन यांनी या स्पर्धेत सहभागी होत सहकाराच्या माध्यमातून आर्थिक आणि सामाजिक विकासाचे महत्त्व प्रभावीपणे मांडले. उत्कट आणि प्रेरणादायी वक्तृत्वाने उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली. यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. शशिकांत म्हाळुंकर उपप्राचार्य डॉ. सुधीर निकम, डॉ. सुरेश भदरगे, डॉ. निनाद जाधव, डॉ. कुलदीप राठौड, रजिस्ट्रार नरेश शिरसाळे यांच्या सह सर्व प्राध्यापकांनी अभिनंदन केले.

# नगरसेवक संतोष तरे यांचा भाजपमध्ये प्रवेश



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**टिटवाळा:** राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अजित पवार गटाचे टिटवाळा येथील माजी नगरसेवक संतोष तरे कायैकत्यानी मध्ये प्रवेश केला आहे, डोंबिवली येथे जिमखाना येथे पक्ष प्रवेश कायैक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, माजी केंद्रीय मंत्री कपील पाटील, आमदार सुलभा गायकवाड, माजी आमदार नरेंद्र पवार, माजी मंत्री जगन्नाथ पाटील, जिल्हा अध्यक्ष नंदु परब, माजी जिल्हा अध्यक्ष नरेंद्र सुयैवंशी, माजी नगरसेवक अभिमन्यू गायकवाड, टिटवाळा मंडळाचे अध्यक्ष शक्तीवान भोईर यांच्या उपस्थितीत मध्ये प्रवेश केला आहे,

# जीवनदीप महाविद्यालय खर्डीच्या सनी विलास गावितने पटाकावले सुवर्ण पदक





दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : मुंबई विद्यापीठांतर्गत आयोजित "मुंबई सिटी झोन, मुंबई सबर्बन झोन आणि ठाणे झोन ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप २०२५- २६" या विद्यापीठ स्तरावरील स्पर्धेत एस.वाय.बी.एस.सी.आय.टी. वर्गातील विद्यार्थी सनी विलास गावित यांनी १० किलो मीटर धावण्याच्या स्पर्धेत सुवर्ण पदक पटकावून जीवनदीप महाविद्यालय खर्डी महाविद्यालयाचे नाव उज्वल केले आहे.

ही स्पर्धा ६ नोव्हेंबर ते ८ नोव्हेंबर २०२५ दरम्यान युनिव्हर्सिटी स्पोर्ट्स पॅव्हेलियन, मरीन लाइन्स, मुंबई येथे पार पडली. विद्यापीठातील विविध झोनमधील शेकडो खेळाडूंमध्ये कडवी स्पर्धा असताना सनी यांनी उत्कृष्ट वेग, तयारी आणि चिकाटीच्या जोरावर आपले स्थान मिळवले.

**सनी विलास गावित यांनी १० किलो मीटर धावण्याच्या स्पर्धेत पटकावले सुवर्ण पदक**

स्पर्धेत त्यांनी दाखविलेल्या शिस्त, मेहनत आणि क्रीडाभावना यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्यांच्या यशाबद्दल जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष श्री रविंद्र घोडविंदे सर, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा कैलास कळकटे, क्रिडा प्रशिक्षक प्रा सोनाली शेलार तसेच प्राध्यापक वर्ग , शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# जीवनदीप महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे ॲथलेटिक्स स्पर्धेत यश





दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**गोवेली** : कु.सोहम संतोष मगर शॉट पुट स्पर्धेत कांस्य पदक ▫ कु.सौरभ कारले लाँग जंप या स्पर्धेत कांस्य पदक▫

ही दोन्ही मुले गोवेली महाविद्यालयात शिकत असून सर्वसाधारण कुटुंबातले आहेत त्यांनी आपल्या जिद्दीने आणि सरावाने दाखवून दिले आहे की गावा ठिकाणी राहणारी मुले ही कोणत्या शहरी मुलांपेक्षा मागे नाही.

या स्पर्धा दिनांक ६/११/२४ ते दिनांक ८/११/ २०२५ रोजी मरीन लाईन मुंबई (मुंबई क्रीडा संकुल) या ठिकाणी पार पडल्या या स्पर्धेत विविध महाविद्यालयाचे शेकडो खेळाडू सहभागी झाले होते. आणि आणि या शेकडो विद्यार्थ्यांमधून विशेष प्राविण्य मिळवणे खरंच कौतुकास्पद आहे.

त्यांच्या या कामगिरीबद्दल संस्थेचे अध्यक्ष.रवींद्र घोडविंदे सर महाविद्यालयाचे प्रा.डॉ.अशोक वाघ सर महाविद्यालयाचे संचालक श्री.प्रशांत घोडविंदे सर आणि संपूर्ण जीवनदीप परिवारानि त्यांचे हार्दिक अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.





**मेष**

अनावश्यक अडथळे आपोआपच संपतील. तुमच्या आईकडून तुम्हाला काही चांगली बातमी मिळू शकते. आज तुम्ही आनंदी असाल.

**वृषभ**

भविष्यात तुम्हाला याचे फायदे मिळतील. आज तुम्ही तुमच्या शेजाऱ्यांसह काही सामाजिक कार्याला पाठिंबा द्याल.तुमचा आदर वाढेल.

**मिथुन**

वडीलधाऱ्यांकडून प्रेरणा घेऊन. तुमची आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी तुमच्या सर्जनशीलतेचा वापर केल्याने महत्त्वपूर्ण फायदे होतील.

**कर्क**

नवीन व्यवसाय सुरू करण्यापूर्वी, सल्ला घ्या. कामाच्या ठिकाणी सहकाऱ्याशी वाद होऊ शकतो. बोलण्यावर संयम ठेवावा लागेल.

**सिंह**

तुम्हाला अचानक एखाद्या धार्मिक कार्यात योगदान देण्याची संधी मिळेल. असे केल्याने तुमच्यात सकारात्मक ऊर्जा भरून जाईल.

**कन्या**

आज तुम्ही एखाद्या नातेवाईकाच्या घरी जाऊ शकता. कौटुंबिक संबंध मजबूत होतील. तुम्ही जे काही काम सुरू कराल ते तुम्ही लवकरच पूर्ण कराल.

**तूळ**

कोणताही नवीन व्यवसाय सुरू करण्यापूर्वी, अनुभवी लोकांचा सल्ला घ्या. संयम आणि संयमाने तुमच्या कामावर लक्ष केंद्रित करणे फायदेशीर ठरेल.

**वृश्चिक**

आज तुमच्या मुलांचे आरोग्य थोडेसे बदलू शकते. पुढे जाण्यापूर्वी चांगल्या डॉक्टरांचा सल्ला घ्या. विद्यार्थ्यांना आज आव्हानात्मक वाटेल.

**धनु**

आर्थिकदृष्ट्या तुम्हाला थोडे सावध राहण्याची गरज आहे. आज तुम्ही एखाद्या परदेशी कंपनीसोबत भागीदारी करू शकता.

**मकर**

मुले त्यांच्या पालकांसोबत त्यांच्या भावना शेअर करतील, ज्यामुळे समस्या लवकर सुटतील. मच्या कामात पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे.

**कुंभ**

एखादा पाहुणा येण्याची शक्यता आहे, ज्यामुळे तुम्ही घरकामात व्यस्त राहू शकता. वैवाहिक नात्यात जोडीदाराला समजून घेण्याचा प्रयत्न करा.

**मीन**

चांगल्या निकालांसाठी तुम्हाला अधिक मेहनत करावी लागेल. कामाच्या बाबतीत तुम्ही अत्यंत व्यावहारिक असाल.





नियमित वाचा दै. ठाणे जीवनदीप वार्ता

# ३०० एकरवर वन उद्यान पालघरचा चेहरा-मोहरा बदलणार !

## पालकमंत्री गणेश नाईक यांचे प्रतिपादन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पालघर :** गडचिरोली जिल्हा हा देशाचे स्टील हब होणार आहे. सर्वात जास्त स्टीलचे उत्पादन त्या जिल्ह्यात होणार आहे. त्या जिल्ह्याच्या बरोबरीने समांतरपणे पालघरची प्रगती होणार आहे. देशाच्या कानाकोपऱ्यातून येणारे रस्ते वाढवण बंदराकडे येणार आहेत. या बंदरामुळे पालघर जिल्ह्याचे रूप नाही, तर स्वरूप बदलणार आहे. पालघरमध्ये ३०० एकरवर वन उद्यान उभारले जाणार आहे. त्यासाठी १२४ कोटींची तरतूद केली आहे, असे प्रतिपादन पालकमंत्री गणेश नाईक यांनी केले.

पालघर येथील आर्यन हायस्कूलच्या मैदानावर चार दिवस सुरू असलेल्या सांसद खेल महोत्सवाच्या सांगता समारंभावेळी गणेश नाईक बोलत होते. या वेळी खासदार डॉ. हेमंत सवरा, आमदार हरिश्चंद्र भोये, भाजप जिल्हाध्यक्ष भरत राजपूत, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष प्रकाश निकम, सुरेखा थेतले, बाबाजी काठोळे आदी उपस्थित होते.

पालघर येथील आर्यन हायस्कूलच्या मैदानावर चार दिवस सुरू असलेल्या सांसद खेल महोत्सवाच्या सांगता समारंभावेळी गणेश नाईक बोलत होते. या वेळी खासदार डॉ. हेमंत सवरा, आमदार हरिश्चंद्र भोये, भाजप जिल्हाध्यक्ष भरत राजपूत, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष प्रकाश निकम, सुरेखा थेतले, बाबाजी काठोळे आदी उपस्थित होते.

हेमंत सवरा यांच्या प्रयत्नातून पहिल्यांदाच मोठा उत्सव होत आहे. पालघरमध्ये जिल्हा क्रीडा संकुल होत आहे. त्यासाठी अधिक आर्थिक तरतूद लागल्यास माझ्याकडे प्रस्ताव द्या, असेही नाईक यांनी आश्वासित केले. या वेळी त्यांच्या हस्ते गुणवंत खेळाडूंना प्रमाणपत्र व रोख बक्षिसे देऊन त्यांना गौरवण्यात आले.

हजारो खेळाडूंची उपस्थिती

तरुणांमधील गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी सांसद खेल महोत्सवाची सुरुवात केली आहे. या खेळ प्रक्रियेत सहा लाख २३ हजार जणांची नोंदणी केली. १६ हजारांपेक्षा जास्त खेळाडूंनी आपली गुणवत्ता येथे सिद्ध केली. पालघरमधील खेळाडूंमध्ये कल्पकता, गुणवत्ता आहे. त्यांना पुढे नेण्यासाठी पालकमंत्र्यांनीसुद्धा प्रयत्न केले पाहिजेत, जेणेकरून पालघर जिल्ह्यातील खेळाडू राज्य राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर आपली चमक दाखवतील, असा आशावाद खासदार डॉ. हेमंत सवरा यांनी व्यक्त केला.



मुरबाड विधानसभा मतदार संघाचे आमदार किसन कथोरे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबई येथील वर्षा निवास स्थानी स्थानिक स्वराज्य संस्थांनच्या निवडणुका व मतदार संघातील विकास कामाबाबत चर्चा केली

# अवघ्या दीड तासांच्या ब्लॉकदरम्यान कल्याण - बदलापूर रेल्वे मार्गावरील अवजड कामे पूर्ण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई, ता. ९ :** मुंबई रेल्वे विकास महामंडळाने (एमआरव्हीसी) कल्याण ते बदलापूर रेल्वे विभागात अवघ्या दीड तासांच्या ब्लॉकदरम्यान मोठी पायाभूत कामे यशस्वीरीत्या पूर्ण केली. ब्लॉक कालावधीत अवघ्या ९० मिनिटांत गर्डर टाकणे आणि जुने पूल हटविण्याची कामे करण्यात आली. हा ब्लॉक शनिवारी (ता. ८) पहाटे २.१५ ते ३.४५ या वेळेत घेण्यात आला होता.

ब्लॉक कालावधीत एमआरव्हीसी आणि मध्य रेल्वेच्या अभियंता व तांत्रिक पथकांनी समन्वय साधत एमआयडीसी रोड ओव्हर ब्रिजसाठी चार गर्डर उभारण्यात आले. त्याचबरोबर अंबरनाथ स्थानकाच्या कल्याण दिशेला असलेल्या पादचारी पुलासाठी पाच नवीन गर्डर बसविण्यात आले. बदलापूर स्थानकावरील जुना पादचारी पूल हटविण्याचे कामही पूर्ण करण्यात आले, तर अंबरनाथ स्थानकाच्या कर्जत टोकावरील पुलाचे दोन्ही स्पॅन उतरविण्यात आले. ही सर्व कामे अत्यंत काळजीपूर्वक, अचूक नियोजन आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने पूर्ण करण्यात आली. एमआरव्हीसीकडून सांगण्यात आले की, 'ब्लॉकदरम्यान ट्रेनची वाहतूक थांबविण्यात आली होती आणि ठरलेल्या वेळेत सर्व कामे पूर्ण करण्यात आली. या कालावधीत पथकांनी संपूर्ण सुरक्षा व्यवस्थेत रेल्वे रूळ, गर्डर आणि पूल परिसरात कामे करण्यात आली.' एमआरव्हीसी आणि मध्य रेल्वे यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे ही कामगिरी वेळेत पार पडल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

> **कल्याण-बदलापूर विभागात अल्प कालावधीत मोठ्या प्रमाणावर कामे पूर्ण करणे ही एक आव्हानात्मक प्रक्रिया होती, मात्र आमच्या पथकांच्या नियोजनबद्ध प्रयत्नांमुळे ती यशस्वी झाली.**
> **- सुनील उदासी, मुख्य जनसंपर्क अधिकारी, एमआरव्हीसी**




# रायफल शूटिंग स्पर्धेतील जीवनदीप महाविद्यालयाची सुवर्ण कामगिरी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

दिनांक ७/११/२५ ते दिनांक ९/११/ २०२५ रोजी रुद्र शूटिंग क्लब, भांडुप या ठिकाणी पार पडलेल्या स्पर्धेत विविध महाविद्यालयाचे खेळाडू सहभागी झाले होते.

या स्पर्धकांमधुन विशेष कामगिरी करत जीवनदीप महाविद्यालय गोवेलीचा विद्यार्थी संकेत पाटील याने ओपन साइड रायफल शूटिंग स्पर्धेतील सुवर्ण कामगिरी सुवर्णपदक मिळवून आपले आणि जीवनदीप महाविद्यालयाचे नाव उज्वल केले. त्याच्या या कामगिरीबद्दल संस्थेचे अध्यक्ष.रवींद्र घोडविंदे सर महाविद्यालयाचे प्रा.डॉ.अशोक वाघ सर महाविद्यालयाचे संचालक श्री.प्रशांत घोडविंदे सर आणि संपूर्ण जीवनदीप परिवारानि त्यांचे हार्दिक अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.




# बदलापूर शहरातील विविध राजकीय पक्षांतील पदाधिकारी ,कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर : बदलापूर शहरात आजचा दिवस ऐतिहासिक ठरला कारण शिवसेनेतील शेकडो कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पार्टीवर विश्वास दाखवत, मोठ्या उत्साहात भाजपच्या विचारधारेचा स्वीकार केला. कार्यसम्राट आमदार श्री किसनजी कथोरे साहेब यांच्या नेतृत्वाखाली आणि शहरातील वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत हा भव्य पक्ष प्रवेश सोहळा पार पडला. या कार्यक्रमात नव्याने प्रवेश केलेल्या सर्व कार्यकर्त्यांनी एकमुखाने सांगितले की, "बदलापूरच्या सर्वांगीण विकासासाठी आणि नागरिकांच्या प्रश्नांवर ठोस भूमिका घेणारी एकमेव पक्ष म्हणजे भारतीय जनता पार्टी!"**



> **"भाजप ही फक्त राजकीय संघटना नसून विकासाची चळवळ आहे. बदलापूरचा सर्वांगीण विकास हा आपला उद्देश आहे, आणि आज सामील झालेले सर्व कार्यकर्ते त्या मिशनचा महत्त्वाचा भाग ठरणार आहेत." - आमदार किसन कथोरे**

त्यामुळेच त्यांनी विकासाच्या प्रवासात सहभागी होण्याचा निर्णय घेतला. पक्ष प्रवेशानंतर सर्व नव्या कार्यकर्त्यांना भगवा शाल व ओळखपत्र देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी भाजपा शहराध्यक्ष, नगरसेवक, महिला मोर्चा, युवा मोर्चा व अनेक पदाधिकारी उपस्थित होते. संघटना विस्तार, जनसंपर्क आणि स्थानिक विकासाच्या उपक्रमांना आता अधिक वेग मिळेल, असा विश्वास सर्वांनी व्यक्त केला. नव्याने प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांचे योगदान बदलापूरच्या विकासाच्या वाटचालीत निश्चितच अमूल्य ठरणार आहे.

# भटक्या कुत्र्याच्या हल्ल्यात दोन वर्षांची चिमुकली गंभीर जखमी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**दिवा :** भटक्या कुत्र्याच्या हल्ल्यात दोन वर्षांची चिमुकली गंभीर जखमी झाल्याची घटना दिव्यातील विकास म्हात्रे गेट परिसरात घडली आहे. वेदा काजारे असे या चिमुकलीचे नाव आहे. ती भावासोबत रस्त्याने चालत असताना मागून आलेल्या भटक्या कुत्र्याने तिचे लचके तोडले. या घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून पालिकेच्या निर्बीजीकरण मोहिमेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले जात आहे. केवळ प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे कुत्र्यांचा सुळसुळाट वाढल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

वेदा सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास भावासोबत खेळण्यासाठी इमारतीच्या खाली उतरली होती. त्याच वेळी मागून आलेल्या भटक्या कुत्र्याने तिच्या पाठीचा जोरदार चावा घेतला. ती खाली कोसळली आणि त्या कुत्र्याने तिचे लचके तोडण्यास सुरुवात केली. या हल्ल्यात वेदाच्या पाठीला, छातीला आणि कमरेला गंभीर दुखापत झाली असून तिच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. कुत्र्याने केलेला हल्ला सीसीटीव्हीत कैद झाला आहे.

> **दिव्यात भटक्या कुत्र्यांची संख्या नियंत्रणाबाहेर गेली आहे. वारंवार तक्रारी करूनही महापालिका त्याकडे कानाडोळा करत आहे. महापालिकेने यावर वेळीच उपाययोजना केली नाही, तर नागरिकांच्या सुरक्षेसाठी परिसरातील सर्व भटके कुत्रे गोळा करून थेट महापालिका कार्यालयात सोडू. ॲड. रोहिदास मुंडे, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) विधानसभा प्रमुख, कल्याण ग्रामीण**

# केवायसी अभावी हजारो शेतकरी वर्षभरापासून मदतीच्या प्रतीक्षेत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बोर्डी, ता. ९ (बातमीदार)**

पालघर जिल्ह्यात केवायसी न झालेल्या हजारो शेतकऱ्यांची संख्या चिंताजनक आहे. त्यांच्या खात्यात भरपाईचे पैसे जमा होणार नसल्यामुळे सरकारी मदतीपासून शेतकरी वंचित राहण्याची शक्यता आहे. मदत व पुनर्वसन विभागाकडून शेतकऱ्यांना मिळणाऱ्या आर्थिक मदतीसाठी असलेली केवायसी करण्याची अट रद्द करावी, अशी मागणी आमदार विनोद निकोले यांनी केली आहे. २०२४ आणि २०२५ या खरीप हंगामात अवकाळी पाऊस, अतिवृष्टी आणि वादळ वाऱ्यामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना कृषी विभागाने आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेतला आहे; मात्र ही मदत मिळण्याची प्रक्रिया अतिशय संथगतीने सुरू आहे. त्यामुळे हजारो शेतकरी वर्षभरापासून मदतीच्या प्रतीक्षेत आहेत. त्यामुळे केवायसीची अट रद्द न झाल्यास, ग्रामीण भागात महसूल विभागाच्या देखरेखीखाली सेतू केंद्रचालकांनी गोरगरीब शेतकऱ्यांना ई-केवायसी करण्यासाठी मदत करावी, अशी विनंतीही निकोले यांनी केली आहे. आमदार निकोले यांनी डहाणू आणि तलासरीतील मदतीच्या प्रक्रियेचा नुकताच आढावा घेतला. डहाणूमध्ये १२,४६८ पैकी ७,२४१ शेतकऱ्यांचे केवायसी झालेले नाही. केवळ चार हजार ८९५ शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा झाले आहेत. तलासरीमध्ये सहा हजार ६६८ पात्र शेतकऱ्यांपैकी १,९४१ जणांचे केवायसी झालेले नाही. दोन हजार ८१६ बाधितांना मदत मिळाली. भरपाई मिळण्यास होत असलेल्या विलंबामुळे शेतकऱ्यांसमोर कठीण परिस्थिती निर्माण झाली असून ते मदतीपासून वंचित राहण्याची भीती विनोद निकोले यांनी व्यक्त केली आहे.

> **शेतकऱ्याला किमान दोन हेक्टर जमिनीवर भरपाई देणे क्रमप्राप्त आहे; परंतु कृषी विभागाकडून २२,५०० रुपयांप्रमाणे दोन हेक्टरसाठी ४५ हजारांचे वाटप करायचे आहेत. दोन हेक्टरपेक्षा कमी क्षेत्र असलेल्या अनेक शेतकऱ्यांना कमी भरपाई देण्यात आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांवर मोठा अन्याय झाला आहे, याची चौकशी होणे गरजेचे असल्याचे विनोद निकोले यांनी सांगितले. याविषयी संबंधित खात्याच्या मंत्र्यांना भेटून लवकरच खुलासा करण्याचा आग्रह धरणार आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.**

# शिवभोजन केंद्रांना सरकारकडून नवसंजीवनी

## सहा महिन्यांपासून थकलेली बिले देण्यासाठी २८ कोटींचे अनुदान

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** महाविकास आघाडीच्या काळात राबविण्यात आलेले महत्त्वाकांक्षी शिवभोजन योजना महायुती सरकारच्या काळात बारगळली. सहा महिन्यांपासून अनुदान वितरित न करण्यात आल्याने 'शिवभोजन थाळी' चालकांकडून वारंवार आंदोलन करण्यात येत होते. या पार्श्वभूमीवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या तोंडावर सरकारकडून ७० कोटींच्या अनुदानापैकी २८ कोटींचे अनुदान वितरित करण्याचे आदेश अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून देण्यात आले. महाविकास आघाडी सरकारच्या काळात 'शिवभोजन थाळी योजना' सुरू करण्यात आली होती. अवघ्या १० रुपयांत दोन चपात्या, भाजी, वरण आणि भात असा आहार गरीब व गरजू जनतेसाठी उपलब्ध करून देण्यात आला होता. मात्र




मागील काही महिन्यांपासून निधी थांबल्याने अनेक जिल्ह्यांतील केंद्र बंद पडली होती. आता अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागाने जारी केलेल्या शासन निर्णयानुसार, या योजनेसाठी २०२५-२६ या आर्थिक वर्षात ७० कोटींची तरतूद असून त्यातील २८ कोटी रुपये तातडीने वितरीत करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. जिल्हा पुरवठा अधिकारी, शिधावाटप अधिकारी आणि उपनियंत्रक यांच्या माध्यमातून निधीचे वाटप करण्यात येणार आहे. यामुळे आता शिवभोजन थाळी चालकांना दिलासा मिळाला असून पुन्हा ही केंद्रे चालू होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# "इतना सन्नाटा क्यों है भाई?"

## ठाण्यात सादर होणार विचारांना हादरवणारा नाट्यप्रयोग

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**प्रतिनिधी :** ६४व्या मराठी राज्य नाट्यस्पर्धेअंतर्गत महाराष्ट्र लोक कल्याणकारी सेवा संस्था, नवीन पनवेल आणि रिफ्लेक्शन थिएटर प्रस्तुत तसेच पनवेलचे उद्योजक व गुजराती नाटक निर्माते श्री. दिपक मिराणी यांच्या निर्मितीतील सामाजिक आशयाने परिपूर्ण आणि भावविश्वाला भिडणारं "इतना सन्नाटा क्यों है भाई?" हे नाटक दि. १८ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी ६:३० वाजता, डॉ. काशीनाथ घाणेकर नाट्यगृह (मिनी थिएटर), ठाणे येथे रंगणार आहे.

या नाटकाचं लेखन आणि दिग्दर्शन संकेत गायकवाड यांनी केलं असून, आजच्या समाजातील न बोललेले प्रश्न आणि मनुष्याच्या अस्तित्वाला हादरवणाऱ्या सत्यांना भिडणारा हा प्रयोग प्रेक्षकांना अंतर्मुख करणारा ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. विषयाच्या गूढतेमुळे आणि मांडणीच्या वेगळेपणामुळे रंगभूमी वर्तुळात या नाटकाबद्दल उत्सुकता निर्माण झाली आहे.

# वसंतस्मृती गुणगौरव सोहळ्यात १० शिक्षण संस्थाचालक, ११५ शिक्षकांसह २५ शिक्षकेतर कर्मयोग्यांचा सन्मान

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधान परिषदेचे माजी उपसभापती स्वर्गीय लोकनेते वसंतरावजी डावखरे यांच्या स्मृती दिनाचं औचित्य साधून कोकण पदवीधर मतदारसंघाचे लाडके व लोकप्रिय आमदार ॲड. मा. श्री. निरंजन डावखरे यांच्या संकल्पनेतून व प्रेरणेतून भाजपा शिक्षक आघाडी कोकण विभागाने ७२० किमी लांबीच्या कोकण प्रांतातील ५ जिल्ह्यातील व ४८ तालुक्यातील सागरी,नागरी व डोंगरी भागातील १० शिक्षण संस्थाचालक,११५ शिक्षक व २५ शिक्षकेत्तर कार्मयोगी यांना वसंतस्मृती पुरस्काराने गौरवान्वित करण्याचा संकल्प केला आणि आज तो संकल्पसिद्धीस जात आहे याचा आम्हास सर्वानंद आहे.

वसंतस्मृती आदर्श शिक्षण संस्थाचालक/ शिक्षक/ शिक्षकेत्तर कर्मचारी गुणगौरव सोहळा एम.एच. हायस्कूल,ठाणेच्या तृप्ती बँक्वेट सभागृहात आज रविवार, दि.९ नोव्हेंबर,२०२५ रोजी सकाळी १०.०० ते २.०० या कालावधीत आयोजित करण्यात आला होता. आजपर्यंत ऑनलाईन प्रस्ताव मागवून सुमारे १००० हून अधिक शिक्षकांना,४० हून अधिक संस्थाचालकाना २५ हून अधिक शिक्षकेत्तर कर्मयोगी यांना स्मृतिचिन्ह व मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले आहे...!

वसंतस्मृती आदर्श शिक्षण संस्थाचालक/शिक्षक/ शिक्षकेत्तर पुरस्कार- गुणगौरव सोहळ्या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ठाण्याचे आमदार संजयजी केळकर,महाराष्ट्र राज्य संस्कृतिक धोरण अंमलबजावणी समितीचे अध्यक्ष डॉ.विनयजी सहस्त्रबुद्धे आणि विशेष अतिथी म्हणून कोकण शिक्षक मतदारसंघाचे आमदार ज्ञानेश्वरजी म्हात्रे,यांच्या उपस्थितीत दिमाखदार आणि दैदिप्यमान सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमानिमित्त मान्यवरांचं स्वागत कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष आमदार निरंजन डावखरे यांनी केलं...!



# "रहे ना रहे हम" कार्यक्रमात महिला वादक, गायिकांच्या सादरीकरणाने संगीतप्रेमी तृप्त

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** लता मंगेशकर, आशा भोसले या नामांकित गायिकांनी अजरामर केलेली एकाहुन एक सुंदर, श्रवणीय गाणी "रहे ना रहे हम" या कार्यक्रमात सादर करुन वादक व गायिकांनी नवी मुंबईतील गानरसिकांना तृप्त केले. प्रदीप नायरकृत पद्मावती एण्टरटेन्ट आणि अर्चना थिएटर व एकलव्य म्युझिकली मॅड यांच्या सौजन्याने या कार्यक्रमाचे आयोजन विष्णुदास भावे नाट्यगृहात शुक्रवारी करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे वैशिट्य म्हणजे सर्वच वादक या महिला होत्या. उमा देवराज यांच्या संगीत संयोजनाखाली प्रियांका मित्रा, अनहिता श्रीवास्तव आणि इतिकार या तीन गायिकांनी हिंदी चित्रपटसृष्टीच्या सुवर्णकाळातील लता मंगेशकर व आशा भोसले यांनी गायिलेली गीते ताकदीने सादर केली. रस्मे उलफत को निभाये, रहे ना रहे हम महेका करेंगे, ना कोई उमंग है, पिया तोसे नैना लागे रे, मेघा छाये आधी रात, आ जाने जा, दैया दैया मे कहॉ आ फसी, अब जो मिले है तो बाहोको बाहोमे रहने दे ए साजना, खतूबा, राम तेरी गंगा मैली, ये है प्यार की हथकडी ही व अशी विविध गीते ऐकून श्रोते सुखावले. या कार्यक्रमाचे निवेदन डॉ. धनश्री सरदेशपांडे यांनी केले.

# मुरबाडमध्ये शेतकऱ्याचा आत्महत्येचा प्रयत्न

**प्रकृती चिंताजनक**

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड :** राज्यात परतीच्या पावसाने धुमाकूळ घातल्याने हातातोंडाशी आलेल्या भात पिकांची दैना व कर्जामुळे शेतकरी चिंतातुर झाले असताना मुरबाड तालुक्यातील जायगाव येथील शेतकरी रमेश देसले या शेतकऱ्याने आज 9 नोव्हेंबर 2025 रोजी शेतातील नेस्तनाबूत झालेले पिक व कर्जाला कंटाळून तणनाशक विषारी औषध पिऊन आपल्या शेतातच आत्महत्येचा प्रयत्न केला. त्यांना तात्काळ शहापूर येथील क्रिस्टल केअर हॉस्पिटल मध्ये उपचारासाठी दाखल केले असून त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे त्यांचे नातलग चंद्रकांत भेरे यांनी सांगितले.

मुरबाड तालुक्यात यंदा भाताची पिके ही चांगली असताना नुकत्याच सततच्या पडलेल्या वादळी पावसामुळे उभी पिके आडवी होऊन शेतीचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले तर हातातोंडाशी आलेल्या घास निसर्गाने पुन्हा हिसकावून घेतल्याने शेतकरी चिंतातुर झाले आहेत. या परिस्थितीला कंटाळून रमेश देसले यांनी आत्महत्येचा प्रयत्न केल्याने सरकारने शेतकऱ्यांच्या गंभीर बाबीकडे लक्ष देऊन सढळ हाताने मदत दिली पाहीजे अशा प्रतिक्रिया शेतकरी व सर्वसामान्य वर्गातून येत आहेत. दरम्यान सरकार यावर काय भुमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# रस्त्यावर कचरा जाळणाऱ्याकडून आकारला 5 हजारांचा दंड

## केडीएमसीच्या क प्रभागाची कारवाई

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या क प्रभाग अंतर्गत दुर्गाडी माता सर्कल ते वाडेकर सर्कल या रस्त्यावरील साफसफाई करण्यात आली. यावेळी पारनाका हजेरी शेड अंतर्गत येणाऱ्या आधारवाडी सर्कल येथील ओमकार मेडिकल या दुकानातील कर्मचारी व अन्य एक नागरिक हे रस्त्यावर कचरा जाळताना आढळले. याबाबत सबंधित दोन्ही व्यक्तींकडून प्रत्येकी 5 हजार असा एकूण 10 हजार दंड आकारण्यात आला. वायु प्रदूषण टाळण्यासाठी नागरिकांनी कोणत्याही प्रकारचा कचरा तसेच पालापाचोळा, झाडे झुडपे हे जाळू नयेत याबाबत आवाहन करण्यात आले असल्याची माहिती क प्रभाग सहाय्यक आयुक्त धनंजय थोरात यांनी दिली.




# भाजपची एकहाती सत्ता येताच कल्याण डोंबिवलीसाठी सुसज्ज रुग्णालय उभारणार

## – माजी आमदार नरेंद्र पवार

**प्रभाग क्रमांक 7 मध्ये संदीप गायकर यांच्या संकल्पनेतून सीसीटीव्ही वितरणाला प्रारंभ**



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीत भाजपची एकहाती सत्ता आल्यानंतर कल्याण डोंबिवलीसाठी सुसज्ज आणि अद्ययावत रुग्णालय उभारण्याची ग्वाही भाजपचे माजी आमदार नरेंद्र पवार यांनी दिली आहे. स्थायी समितीचे माजी सभापती संदीप गायकर यांच्या संकल्पनेतून प्रभाग क्रमांक 7 मध्ये राबविण्यात येणाऱ्या सीसीटीव्ही वितरण कार्यक्रमात ते बोलत होते.

कल्याण डोंबिवलीसाठी एका चांगल्या शासकीय रुग्णालयाची नितांत आवश्यकता आहे. चांगली आरोग्य सुविधा आपल्याकडे उपलब्ध नसल्याने आपल्याकडील गरीब आणि गरजू रुग्णांना ठाणे - मुंबईतील रुग्णालयांमध्ये पाठवावे लागत आहे. तिकडे जाण्यासाठी लागणारा वेळ पाहता रुग्णांच्या जीवाला धोका निर्माण होतो. या पार्श्वभूमीवर आगामी महापालिका निवडणुकीत भाजपला संपूर्ण बहुमत मिळाले तर चांगल्या रुग्णालयाची आम्ही तातडीने उभारणी करू असा विश्वास माजी आमदार नरेंद्र पवार यांनी व्यक्त केला. यापूर्वी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमध्ये भाजपचे महापौर, उपमहापौर होते, परंतु एकहाती सत्ता नसल्याने आम्हाला मर्यादा होत्या. परंतु आता केंद्रामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाचा आणि राज्यामध्ये देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्याचा कारभार अत्यंत सक्षमतेने सांभाळत आहेत. त्यांच्याकडून अनेक जनहिताचे निर्णय, विकासकामे अतिशय वेगाने सुरू असल्याचेही पवार यांनी यावेळी स्पष्ट केले.

**प्रभागात लोकप्रतिनिधींकडून सीसीटीव्ही वाटप करण्याची राज्यातील पहिलाच उपक्रम...**

नुकत्याच झालेल्या भाऊबीजेच्या निमित्ताने कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे माजी सभापती आणि नगरसेवक संदीप गायकर यांनी प्रभागांमध्ये स्वखर्चातून सीसीटीव्ही बसवण्याचा निर्णय घेतला होता. आतापर्यंत ठाणे, असो मुंबई असो की पुणे, या कोणत्याही ठिकाणी अशा प्रकारचा उपक्रम कोणीही राबविला नसल्याचे सांगत नरेंद्र पवार यांनी संदीप गायकर यांच्या संकल्पनेचे कौतुक केले.

नुकत्याच झालेल्या त्रिपुरी पौर्णिमेनिमित्त या सीसीटीव्ही वितरण उपक्रमाला प्रारंभ करण्यात आला. प्रभाग क्रमांक 7 मधील साईबाबा नगर, मारुती मंदिर ढगे चाळ तसेच संतोषी माता मंदिर, शिवाजी नगर, शिवाजी मित्र मंडळ, पारिजात चाळ आणि शिवाजी नगर या भागांमध्ये अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत हे सीसीटीव्ही वितरण करण्यात आले.

यावेळी माजी नगरसेवक संदीप गायकर, भाजपा जुने कल्याण मंडल महिला मोर्चा अध्यक्षा हेमलता पवार, महिला मोर्चा प्रदेश सचिव प्रिया शर्मा, माजी नगरसेविका वैशाली पाटील, भाजपा वैद्यकीय आघाडी संयोजक डॉ.पंकज उपाध्याय, उद्योजक शामल मंगेश गायकर, राजेश ठाणगे, संदीप गडगे, चंदू बिरारी, गणेश हिरे, प्रशांत महाजन, रोहित लांबतुरे, विवेक कुलकर्णी, भारती सातपुते, रोहित कुलकर्णी, दिपक दोरलेकर, समृद्ध ताडमारे, भगवान म्हात्रे, सदा कोकणे, तसेच परिसरातील स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पक्षी सप्ताहाच्या माध्यमातून

# `जागर उडत्या पक्षांचा`



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** पक्षी हा सृष्टीतील महत्वाचा घटक आहे. बदलत्या पर्यावरणाचे इंडिकेटर म्हणूनही पक्षाला संबोधले जाते. महाराष्ट्राच्या प्रत्येक अधिवासातील पक्ष्यांतही वैविध्य आहे. नोव्हेंबर महिना परदेशातील, हिमालयतील स्थलांतरित पक्षी महाराष्ट्रात येण्याचा काळ आहे. या दृष्टिने नोव्हेंबर महिना हा पक्षांचे स्थलांतरासाठी महत्वाचा मानला जातो. दि. 05 नोव्हेंबर रोजी साहित्यिक, सेवानिवृत्त वनाधिकारी मारुती चितमपल्ली यांचा जन्मदिन तर आणि दि.12 नोव्हेंबर रोजी पद्मभूषण पक्षिशास्त्रज्ञ डॉ. सलीम अली यांची जयंती. या दोन्ही दिवसांचे औचित्य साधून दि. 5 नोव्हेंबर ते दि. 12 नोव्हेंबर रोजी पक्षी सप्ताह साजरा केला जातो. सन 2017 मध्ये राज्यात पहिल्यांदा पक्षी सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र सरकारने सन 2020 मध्ये राज्यात या कालावधीत पक्षी सप्ताह साजरा करण्याची घोषणा केली. महाराष्ट्र राज्य पक्षी सप्ताह साजरे करणारे भारतातील पहिले राज्य आहे. हरियाल हा आपला राज्यपक्षी आहे. महाराष्टात 450 पेक्षा जास्त प्रकारचे पक्षी आहेत.

राज्यातील पक्ष्यांची जैवविविधता झपाट्याने कमी होत असून अनेक पक्षी प्रजाती दुर्मीळ श्रेणीत समाविष्ट होत आहेत. जैवविविधतेचे संरक्षण व संवर्धनाच्या दृष्टीने निसर्गातील प्रत्येक घटकाचे महत्त्व विशद व्हावे व लोकजागृती व्हावी हे यामागचे उद्देश्य आहे.राज्यातील पक्ष्याचे महत्त्व प्रत्येक नागरिकांपर्यंत पोहोचवून त्यांच्या संरक्षणाप्रती जबाबदारी स्पष्ट व्हावी यासाठी व्यापक जनजागृती होण्याची गरज आहे.

या सप्ताहाचे औचित्य साधून स्पॅरोताई फाऊंडेशन, ठाणे संस्थापक डॉ.ज्योती परब, डॉ.राज परब व समन्वयक सुप्रसिद्ध चित्रकार लीलाधर कोल्हे, जळगाव यांच्या संकल्पनेतून दि.५ नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबर या दरम्यान पक्षी सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. सदरचा उपक्रम 2020 पासून सातत्याने सुरु आहे. यामध्ये निसर्ग वाचवा! पर्यावरण वाचवा हा उद्देश डोळयासमोर ठेवून मलार्ड पक्षी ( चतुरंग बदक ), सुलतान टीट, शंखिनी पक्षी, कीर पोपट, तांबट पक्षी, ठिपकेदार मुनिया पक्षी, रॉयल क्लायकॅचर, सह विविध पक्ष्यांची चित्रे काढून त्यांची माहिती चित्रासोबत देऊन या पक्षांचा इतिहास लोकांपर्यंत सोशल मिडीयाचे माध्यमातून पाठवून पक्षीओळख व पक्षांचे महत्व सांगण्यात आले आहे. हा उपक्रम या संस्थेच्या माध्यमातून दरवर्षी राबवून पक्षांचे संरक्षण व संवर्धनाचा संदेश दिला जातो. या उपक्रमामुळे निसर्गातील विविध पक्षांची माहिती, सदर पक्षी व त्याच्या इतिहासाची सर्वची ओळख नवीन तंत्रज्ञानाच्या युगातील युवा पिढीला होत आहे.

# भिवंडी महापालिका निवडणुकीसाठी आरक्षण सोडत जाहीर

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी :** महाराष्ट्रात व ठाणे जिल्ह्यात नगरपालिका आणि नगरपंचायतीच्या निवडणुका २ डिसेंबर २०२५ रोजी होणार आहेत त्यानंतर महानगरपालिकेच्या निवडणुका जाहीर होण्याची शक्यता आहे. त्या दृष्टीने भिवंडी महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी महापालिका प्रशासनाने तयारी सुरू केली आहे.

राज्य निवडणुक आयोग,महाराष्ट्र यांच्या आदेशानुसार भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक २०२५ करीता आरक्षण निश्चिती व सोडत कार्यक्रम मंगळवार दिनांक ११ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता भिवंडी शहरातील अंजूरफाटा येथील मानसी भारत गडा पदवी महाविद्यालय येथील शांती चंदन सभागृहाच्या तळमजल्यावर येथे आयोजित करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने मनपाचे प्रशासक तथा आयुक्त अनमोल सागर यांनी महापालिकेच्या निवडणूक विभागातील आणि महापालिकेच्या अंतर्गत विविध विभागातील ३३ प्रमुख अधिकारी कर्मचाऱ्यांची आणि जबाबदारी निश्चित करून नियुक्ती केली आहे.या आरक्षणाच्या सोडतीसाठी शहरातील सर्व लोकप्रतिनिधी तसेच भिवंडी शहरातील मान्यताप्राप्त, राष्ट्रीय व राज्यस्तरीय पक्षांचे शहर अध्यक्ष तसेच नागरिकांना स्वतंत्रपणे कळविण्याची जबाबदारी पालिकेच्या जनसंपर्क अधिकाऱ्यावर सोपविली आहे. तसेच लोकांपर्यंत पोहोचणाऱ्या सर्व माध्यमाद्वारे प्रसिद्धी देण्याचे काम मनपाच्या जनसंपर्क अधिकाऱ्यांवर सोपविले आहे. तसेच अग्निशामक दल,वैद्यकीय आरोग्य अधिकारी आणि सुरक्षा अधिकाऱ्यांना आपली कुमक घेऊन उपस्थित राहण्यास सांगितले आहे. तर निवडणूक विभागाच्या प्रभाग अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना विविध कामे सोपविण्यात आले आहेत. गेल्या काही महिन्यापासून निवडणुकीची वाट पाहणाऱ्या शहरातील काँग्रेस,समाजवादी, भाजप,शिवसेना राष्ट्रवादी काँग्रेस,महाराष्ट्र नवनिर्माण सेनेसह अपक्ष इच्छुक उमेदवारांमध्ये या आरक्षण निश्चितीचे आकर्षण असून या आरक्षणामुळे उमेदवारांचे भविष्य घडणार आहे. त्यामुळे या आरक्षणाच्या वेळी इच्छुक उमेदवार या कार्यक्रमास गर्दी करणार आहेत. तसेच आपल्या प्रभागाचे आणि वार्डासह उमेदवाराचे आरक्षण पाहण्यासाठी उमेदवारांचे हस्तक देखील गर्दी करणार असल्याने पोलिसांवर ताण येणार आहे. त्यामुळे परिस्थीती नियंत्रणात ठेवण्यासाठी सर्वच यंत्रणांची जबाबदारी वाढली आहे.मात्र शहरात नागरी समस्या मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. मात्र त्याकडे कोणीही फारसे लक्ष दिले नाही त्यामुळे मतदार नागरिक निवडणुकीबाबत निरुत्साही दिसत असून त्याचे चित्र येत्या निवडणूक मतदानाचे दिवशी दिसेल अशी चर्चा सर्वत्र दबक्या आवाजात सुरू आहे. या आरक्षण सोडतीचे थेट प्रक्षेपण युट्युब या समाजमाध्यमावर देखील करण्यात येणार असून, त्याची लिंक https://youtube.com/@bncmc.bhiwandi.official?si=NgQH5u8jpLEtDSBo अशी आहे. त्यामुळे नागरीक वरील युट्युब लिंकवर देखील सोडत पाहुन शकतील अशी माहिती महापालिका प्रशासनाकडून देण्यात आली.

# शिक्षक अधिकारी कर्मचाऱ्यांच्या तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा संपन्न

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** नोव्हेंबर २०२५ रोजी ठाणे मनपा शाळा क्रमांक 23, किसननगर, ठाणे येथे तालुका स्तरीय शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांच्या क्रीडा स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडल्या.

कार्यक्रमाचे उद्घाटन शिक्षण उपायुक्त सचिन सांगळे, शिक्षणाधिकारी कमलाकांत म्हेत्रे साहेब, गट अधिकारी संगिता बामणे मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास युआरसी समन्वयक मुश्ताक पठाण गटप्रमुख, सीआरसी प्रमुख, विषयतज्ज्ञ, मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी वंदेमातरम् गीताच्या वर्धापनदिनानिमित्त वंदेमातरम् गीत गायन व विद्यार्थी दिन कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.




या स्पर्धेत धावण्याची शर्यत, गोळाफेक, थाळीफेक, लांब उडी, बॅडमिंटन अशा विविध क्रीडा प्रकारांचा समावेश होता. सर्व स्पर्धकांनी उत्साहाने सहभाग घेतला आणि "खेळाडूवृत्ती" या भावनेने स्पर्धा खेळल्या. विजेत्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. वंदे मातरम गीताच्या 150 व्या वर्धापन दिनानिमित्त सर्वांनी वंदेमातरम गीताचे सामुहिक गायन केले. उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून क्रीडेमुळे शारीरिक तसेच मानसिक तंदुरुस्ती राखली जाते, तसेच सहकार्य भावना, शिस्त आणि टीमस्पिरिट विकसित होते, मैत्रीपूर्ण संबंध दृढ करण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निलिमा पाटील यांनी केले.

# मनसे उपविभागप्रमुख अजय बागुल यांना मारहाण

## टोळक्याविरोधात गुन्हा दाखल

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**उल्हासनगर :** भांडणात मध्यस्थी करण्यास गेलेल्या मनसे उपविभागप्रमुख अजय बागुल यांना मारहाण झाली. याप्रकरणी विठ्ठलवाडी पोलिस ठाण्यात एका टोळक्याविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. उल्हासनगर कॅम्प क्रमांक ४, येथील सीएसजी गॅस पंपाच्या रस्त्याने शुक्रवारी मध्यरात्री बागुल घरी जात होते. सीएसजी पंपासमोरील चायनीस गाडीवर काही जणांत भांडण सुरू होते. हे भांडण सोडविण्यासाठी गेलेल्या अजय यांना नशेखोर युवकांनी मारहाण केली.

# विचारांच्या शक्तीने उडवले चष्मे

## गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंदला गेला दिनेश गुप्ता यांचा विक्रम

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** राष्ट्रीय एकता दिनानिमित्त प्रेरक वक्ते आणि मेंटलिस्ट प्रो. डॉ. दिनेश किशोर गुप्ता आनंदश्री यांनी असे आश्चर्यकारक कामगिरी केली की उपस्थित प्रत्येकजण थक्क झाला. त्यांनी केवळ एका मिनिटात 30 चष्मे न स्पर्श करता हवेत उडवून 180 अंशांनी फिरवले आणि या अद्भुत प्रयोगातून गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड आपल्या नावावर केला.

हा जागतिक विक्रम नुकताच खडकपाडा येथील एम जे ऑप्टिक्स येथे प्रस्थापित करण्यात आला. या विक्रमाची खात्री गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्स संस्थेने अधिकृतरीत्या केली असून, संपूर्ण व्हिडिओ पाहून त्याची पुष्टी केली आहे. संस्थेने ईमेलद्वारे अधिकृत प्रमाणपत्र आणि ऑनलाइन सर्टिफिकेट जारी केले असून, त्यांच्या वेबसाईटवरही दिनेश गुप्ता यांच्या या अप्रतिम कार्याचा उल्लेख करण्यात आला आहे.



या विक्रमाच्या वेळी रोटरी क्लब ऑफ कल्याण डायमंडचे अध्यक्ष डॉ. संदीप वनसूत्रे, निशिगंधा वनसूत्रे, मुंशीर मलिक, तसेच वैदिक गणित तज्ञ शेखर सरोज साक्षीदार म्हणून उपस्थित होते. दिनेश गुप्ता यांनी सांगितले की हा विचार त्यांना परफॉर्मन्सदरम्यान अचानक सुचला — "जेव्हा तुम्ही तुमच्या मनाच्या शक्तीवर विश्वास ठेवता, तेव्हा अशक्यही शक्य होतं." हा त्यांचा गिनीज बुकमधील दुसरा वर्ल्ड रेकॉर्ड आहे.







Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024